# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

## सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - १४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता**<br>**रूपये:- ५६,९१,१८,८७,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१) | १७० | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रामधील के/पूर्व विभागात कांतीलाल कंपाऊड, हंजर नगर , मेघवाडी, शामनगर, कोकणनगर, प्रेमनगर, अग्रवालनगर ,प्रतापनगर, फ्रांन्सीसवाडी, चाचानगर, बांद्रेकरवाडी, मकानी पाडा या ठिकाणी अत्यंत अपुरा पाणी पुरवठा होणे, काही ठिकाणीचा भाग हा उंचावट्यावर असल्याने कमी दाबाने पाणी पुरवठा होणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक ३०/१२/२०२४ रोजी मा.जलअभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका,वरळी, मुंबई यांना पत्राद्वारे सदर बाब निदर्शनास आणूनही अदयाप पाणी पुरवठा विभागाकाडून कोणतीच कार्यवाही न होणे, त्याचबरोबर याच क्षेत्रातील प्रभाग क्र.७३ मध्ये समर्थ नगर जवळ आजुबाजूच्या लोकवस्तीत पाणी पुरवठा करण्यासाठी फार वर्षापासून अस्तित्वात असलेले उदंचन केंद्र असणे, सदरचे उदंचन हे त्यावेळेच्या लोकवस्तीनुसार होणे, परंतु सद्यस्थितीत लोकवस्ती वाढलेली असून पाटीलवाडी व शिवटेकडी या उंच भागात राहणाऱ्या नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, त्यांना उदंचन पंपाद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी उदंचन केंद्राची निर्मिती त्याची देखभाल व परिरक्षण यासाठी आवश्यक तो निधी तरतूद करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५७९ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदार संघामधील रामगड या उंचावरील भागात गेल्या अनेक वर्षापासून अपुरा पाणी पुरवठा होत आहे, तेथील रहिवाशांना पाणी पुरवठा सुरळित व्हावा म्हणून त्याठिकाणी उदंचन केंद्र बनविणे अत्यावश्यक आहे, .त्याकरिता निधीची आवश्यकता असून उदंचन केंद्र करिता निधीची उपलब्धता करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (३) | ५४१ | १०० | वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील केवळ १ हजार लोकसंख्या असलेले निरगुडी हे गाव पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असणे, पिंपरी-चिंचवड शहरातील सांडपाण्यामुळे या गावातील पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत पूर्ण खराब झाल्यामुळे सदर गावासाठी सन २०११-१२ मध्ये पाणी पुरवठ्याच्या लाईनचे काम पूर्ण करून पिंपरी चिंचवड महापालिकेकडे पिण्याच्या पाण्याची मागणी करण्यात येणे, परंतु केवळ १ हजार लोकांसाठीही पिंपरी चिंचवड महापालिकेने पाणी देण्यास नकार देणे, त्यामुळे सदर योजना अद्याप प्रलंबित राहणे, यामुळे नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी अतोनात हाल होणे, त्यामुळे मी सातत्याने पिंपरी चिंचवड महापालिकेकडे या १००० लोकसंख्येच्या गावासाठी पाणी देण्याची मागणी, परंतु सदर मागणी अद्याप मान्य न करणे, सबब सदर गावासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने पिण्याचे पाणी देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय पोतनीस** |
| (४) | २४३ | १०० | वाकोला विभागातील गावदेवी, मिलिंद नगर, सुब्रमण्यम नगर तसेच कलिना विभागातील शास्त्री नगर, कोलिव्हरी व्हिलेज जांभळीपाडा येथे अनेक दिवसापासून पुरेसा पाणी पुरवठा होत नसणे, यासदंर्भात नवीन जलजोडणीचे प्रस्ताव जलकामे/बांधकाम विभागात अनेक दिवसांपासून प्रलंबित असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १४/१/२०२५ रोजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे करणे, पत्राच्या अनुषंगाने अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५) | ५७२ | १० | ग्रामीण भागातील प्रत्येक घरात नळा द्वारे पाणी पुरवठा करण्याची योजना शासनाच्या वतीने राबविण्यासाठी जलजीवन मिशन योजना मोठया प्रमाणात राबविण्यात येणे, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी, सावली व ब्रम्हपुरी तालुक्यासह राज्यातील ग्रामीण भागातील अनेक गावात पाणी पुरवठा योजना कंत्राटदाराच्या मार्फतीने सुरु असणे, कंत्राटदारांनी केलेल्या कामाचे बिल पाणी पुरवठा विभाग यांनी तयार करून ते देयके देण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी करणे, मात्र गेल्या सहा महिन्यापासून संबंधित विभागास निधी प्राप्त झाले नसल्याने कंत्राटदारांनी काम बंद आंदोलन सुरु करणे, त्यामुळे अनेक गावातील पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम अर्धवट असणे, येत्या काही दिवसात उन्हाळा सुरु होणार असल्याने नागरिकांना स्वच्छ नळाच्या पाण्यापासून वंचित रहावे लागणे, या कामाचा निधी तातडीने संबंधित विभागास मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६) | ३८९ | १० | मौ.माळीण ता.अंबेगाव, जि. पुणे या गावावर दि. ३० जुलै, २०२४ रोजी वा सुमारास डोंगराचा कडा कोसळून १५१ ग्रामस्थांचा मृत्यू झाला असणे, शासनाने गावाचे पुनर्वसन केले असणे, ग्रामस्थांना नळाव्दारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली, मात्र सदरच्या नळाला पाणीच येत नसणे, त्यामुळे ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्या अभावी हाल अपेष्टा होत असणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला नसणे, पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, ग्रामस्था लांब पल्यावरुन पाणी आणावे लागत असणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (७) | ३९२ | १० | टिंजेल टाऊन, सहकारी गृहनिर्माण संस्था लि. हिंजेवाडी फेस-२ मानगाव जि.पुणे येथे नळाचे पिण्याच्या पिण्याचे मिळत नसणे, पिण्याच्या पाण्याची त्या ठिकाणी लाईन टाकली नसणे, पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, पिण्याच्या पाण्या अभावी स्थानिक नागरिक वंचित रहात असणे, त्यामुळे त्यांना दुषित पाणी प्यावे लागत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ३९४ | १० | हर घर नल से जल ही केंद्राची महत्वाकांक्षी योजना संपूर्ण भारतात राबविली जाणे, महाराष्ट्र राज्यातही ह्या योजनेचे काम सुरू असणे, पालघर जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून सदर योजनेचे काम सुरू असणे, पालघर शहरासह डहाणू तालुक्यातील ११३ गावे, तलासरी ३६, गावे जव्हार १९० गावे, मोखाडा ५६ गावे, पालघर ७८ गावे, वसई २२ गावे, वाडा १४७ गावे आणि विक्रमगड ८२ गावे असे मिळून ७२४ गावांसाठी ९४१ कोटी ३४ लाख ५९ हजार रुपये खर्च झालेले असणे, मात्र सदर निधी खर्च होऊनही 'हर घर नल से जल' ची अनेक कामे अर्धवट व अपूर्ण असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ३९५ | १० | गोंदिया जिल्हयातील सडक-अर्जुनी तालुक्यातील हलबीटोला, पांढरी, डुंडा, मुरपार, रामरेंगेपार, या ठिकाणी लाखो रुपये खर्चून 'जलजिवन मिशन' योजने अंतर्गत नळपाणी योजना कार्यान्वित करण्यात आली असणे, कंत्राटदाराने गावात पाईपलाईन करून सौरऊर्जेची प्लेट लावली गेली तरी गावातील नागरिकांना या योजनेची एक घागर पाणीसुद्धा मिळाली नसल्यामुळे शासनाच्या 'हर घर जल, हर घर नल' योजनेची अंमलबजावणीस दिरंगाई होत असणे, त्यामुळे गावातील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नागरिकांवर माहे मार्च, एप्रिल, मे २०२५ या महिन्यात ऐन उन्हाळयात हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येणार असणे, सडक अर्जुनी तालुक्यातील सर्व 'जल जीवन मिशन' योजनेची कामे तातडीने सुरु करण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर २०२४ पासून आजपर्यंत मागणी करूनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, 'जल जिवन मिशन' अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना बंद असल्याने सामान्य नागरिकांमध्ये पसरलेली संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ५४७ | १० | जत, जि. सांगली, लातूर शहरातील मयूरबन विभाग व इतर विभागामध्ये मोठया प्रमाणावर पाणी टंचाई निर्माण झाली असणे, मयूरबन मधील रिध्दी-सिध्दी या इमारतीलाही टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असणे, नळपाणी पुरवठा बंद असणे, पाईपलाईन फुटणे, जलजीवन मशिनची कामे अपूरी असणे, पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, शहरांना पिण्याचे पाणी तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| (११) | ५५८ | १० | मौ. मौजमाबाद, ता.पालम, जि.परभणी सदरचे गाव डोंगराळ भागात असून आड मार्गावर असणे, याठिकाणी पिण्याच्या पाण्याचे हापसे मंजूर करणे, हापसे खोदण्याची गरज असणे, नागरीकांना पिण्याचे पाणी मिळत नसणे, पिण्याच्या पाण्याची नळ योजना मंजूर करण्याची गरज असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५५९ | १० | मौ. बनवस, ता.पालम, जि.परभणी येथे पिण्याच्या पाण्याची सुधारित नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करणे, सदरच्या गावाची लोकसंख्या वाढली असणे, गावाचा विस्तार झाला असणे, शाळा व कॉलेज वाढले असणे, त्यामुळे पिण्याचे पाणी कमी पडत असणे, पिण्याच्या पाण्याअभावी नागरिक त्रस्त झाले असणे, त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सुधारित नळपाणी पुरवठा योजना मंजूर करणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ५६३ | १० | मौ. तांदुळवाडी, ता.पालम, जि.परभणी येथे पिण्याच्या पाण्याची नळ योजना मंजूर करण्याची अवश्यकता निर्माण झाली असणे, स्थानिक नागरीकांना नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळत नसणे, पिण्याच्या पाण्याअभावी नागरीकांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे हातपंप सुरु करण्याची गरज असणे, सुधारित पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: वाय-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५१, सचिवालयीन-आर्थिक सेवा**<br>**रूपये:- ७४,६९,८१,०००/-**<br>**श्री. राजु खरे** |
| (१४) | ५६४ | १०० | मोहोळ तालुक्यातील जनतेला तसेच शहरवासीयांना पिण्याच्या पाण्याची वणवण करावी लागते, विशेष म्हणजे सोलापूर शहरात साठी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन मोहोळ शहरालगतुन जात आहे गेल्या ३० ते ४० वर्षाच्या पासून शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसाच प्रलंबित असणे, तरी शहराच्या व तालुक्याच्या जनतेच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १८ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई